सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## महसूल व वन विभाग
## जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर
## अनुसूचित जमाती प्रवर्गातील पदभरती-2019/2020
## जाहिर प्रगटन

जाहिरात क्र.मह/आस्था/कार्या.5अ-2/पदभरती/11/2020 दि.14/01/2020.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.308/ 16-ब, दि. 21 डिसेंबर, 2019 अन्वये सर्व प्रशासकीय विभागांनी खुद्द व त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय / निमशासकीय कार्यालयातील, सदर शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या कारणास्तव अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचा-यांची सेवा अधिसंख्य पदावर वर्ग झाल्यानंतर रिक्त होणारी अनुसूचित जमाती प्रवर्गाची पदे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांमधुन सेवाप्रवेश नियमानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून कालबंध्द कार्यक्रमानुसार भरण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने वरील परिच्छेदात नमुद शासन निर्देशानुसार जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे आस्थापनेवरील गट-क मधील तलाठी व वाहनचालक संवर्गातील पदे अनुसूचित जमाती प्रवर्गातुन भरणेकरीता दि.12/01/2020 रोजी लेखी परीक्षा घेण्यात आलेली आहे. तसेच सदर लेखी परीक्षेची आदर्श उत्तरपत्रिका (प्रश्नसंच A,B,C,D संचनिहाय) दि.12/01/2020 रोजी प्रसिध्द करण्यात येऊन आदर्श उत्तरपत्रिकेमध्ये नमुद उत्तरावर कोणाच्या काही हरकती / आक्षेप असल्यास सदरचे आक्षेप आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह (संदर्भासह) जिल्हाधिकारी कार्यालय (महसूल शाखा) येथे दि.13/01/2020 रोजी (सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत) समक्ष अथवा ई-मेल आयडी tahsildarrevahmednagar@gmail.com वर सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. आदर्श उत्तरतालिकेबाबत विहित मुदतीत एकही हरकत / आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

सदर लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे दि.14/01/2020 रोजी दुपारी 3.00 वाजता कॉन्फरन्स हॉल, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे स्कॅनिंग करण्याचे कामकाज पार पाडण्यात येणार आहे. तरी **ज्या परीक्षार्थी उमेदवारांना उत्तरपत्रिका स्कॅनिगचे कामकाज पाहण्याची इच्छा आहे, अशा उमेदवारांनी आज दि.14/01/2020 रोजी दुपारी 3.00 वाजता कॉन्फरन्स हॉल, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उपस्थित रहावे.** उक्त कामकाजावेळी इच्छुक परीक्षार्थी उमेदवार उपस्थित राहिले नाहीत, तर त्यांचे गैरहजेरीत कामकाज पुर्ण करण्यात येईल, याची सर्व परीक्षार्थी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - अहमदनगर
दिनांक - 14/01/2020.

स्वाक्षरीत/-
सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
निवासी उपजिल्हाधिकारी अहमदनगर

- -

Scanned by CamScanner